आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१५ जानेवारी २०२६ - गुरुवार

## <u>ठळक बातम्या</u>

- समाजातल्या सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी मतदान सुरु/ मुंबईत साडे अकरा वाजेपर्यंत सुमारे १७ पूर्णांक ७३ शतांश टक्के मतदान

- २०२५-२६ मधे भारताचा जीडीपी वाढीचा दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा जागतिक बँकेचा अंदाज

## <u>आणि</u>

- इराणमधल्या अस्थिर राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिकांनी इराणला जाऊ नये असा परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचा सल्ला

**<><><><><>**

लोकशाही संस्था आणि लोकशाही प्रक्रियांमुळे लोकशाही राज्यपद्धतीला स्थैर्य आणि वेग मिळतो, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं राष्ट्रकुल संघटनेतल्या देशांचे पीठासीन अधिकारी आणि अध्यक्षांच्या परिषदेला ते

संबोधित करत होते. या परिषदेचं महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले,

*होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी*

भारतानं आपल्या विविधतेतून आपली लोकशाही बळकट केली, असं प्रधानमंत्री म्हणाले. समाजातल्या सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ आहे आणि कोणताही भेदभाव न करता सामाजिक हित साधण्यासाठी सरकार काम करत आहे, असं त्यांनी सांगितलं. गेल्या काही वर्षांत जवळपास २५ कोटी नागरिकांना दारिद्र्यातून बाहेर काढल्याचं त्यांनी नमूद केलं. ग्लोबल साऊथचे मुद्दे प्रत्येक जागतिक मंचावर भारत जोरकसपणे मांडत आहे, असंही त्यांनी सांगितलं.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाजमाध्यमांनी लोकशाही संस्थांची कार्यक्षमता वाढवली आहे, असं मत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी यावेळी मांडलं. मात्र, या नव्या तंत्रज्ञानाच्या गैरवापरामुळे चुकीची माहिती, सायबर गुन्हेगारी आणि भेदभावही वाढत असल्याचं ते म्हणाले. या आव्हानांचा सामना करण्यासाठी योग्य ती पावलं उचलण्याची गरज बिर्ला यांनी अधोरेखित केली. या परिषदेत महत्त्वाच्या जागतिक प्रश्नांवर चर्चा

होईल आणि ठोस धोरणात्मक निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. भारतीय संसदेची गेल्या ७ दशकांची वाटचालही त्यांनी अधोरेखित केली.

*होल्ड... बाईट- ओम बिर्ला*

संवाद, चर्चा आणि मतभेदाच्या प्राचीन भारतीय परंपरेतून देशाच्या संसदीय प्रणालीला बळ मिळालं आहे, असं प्रतिपादन राज्यसभेचे उपाध्यक्ष हरीवंश यांनी यावेळी केलं.

राष्ट्रकुल संघटनेतल्या ४२ सदस्य देशांचे ६१ अध्यक्ष आणि पीठासीन अधिकारी या परिषदेत भाग घेत आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांमधे आज सकाळी साडेआठ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. मुंबईत सकाळी साडेअकरा वाजेपर्यंत सुमारे १७ पूर्णांक ७३ शतांश टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. काही मतदान केंद्रांवरच्या किरकोळ तक्रारी वगळता मतदान शांततेत सुरु आहे. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

*होल्ड... व्हीसी*

(राजधानी मुंबईत मतदानाच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय यंत्रणा सतर्क आहेत. मुंबईत एकूण १० हजार २३१ मतदान केंद्र असून केंद्रांसभोवतालच्या परिसरात सुरक्षा व्यवस्था चोख ठेवण्यात आली आहे. या निवडणुकीत एकूण सतराशे उमेदवारांचं भवितव्य १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ मतदार ठरवतील. यापैकी ४८ लाख २६ हजार ५०९ महिला तर १ हजार ९९ इतर मतदार आहेत. काही ठिकाणी मतदार यादींचा गोंधळ दिसून येत आहे मतदार यादी मध्ये नावं शोधण्यासाठी मतदारांची धावपळ होत आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच गरोदर महिलांसाठी प्रत्येक केंद्रावर विशेष व्यवस्था आहे.

मुंबईतले केंद्रीय मंत्री पीयुष गोयल, खासदार रविंद्र वायकर, आमदार संजय उपाध्याय, तसंच उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, या नेत्यांनी मतदानाचा हक्क बजावला.

अभिनेता अक्षय कुमार, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर इत्यादी प्रसिद्ध व्यक्तिमत्वांनी मतदान केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर महानगरपालिकेसाठी आज सकाळी मतदान केलं.

*सर्वांनी मतदानाचा हक्क आणि कर्तव्यही बजावावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.)*

*होल्ड - बाईट - मुख्यमंत्री*

**<><><><><>**

महानगरपालिका निवडणुकीत सकाळी साडे अकरा वाजेपर्यंत झालेल्या मतदानाची महानगरपालिकानिहाय आकडेवारी याप्रमाणे...

बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी सकाळी साडे अकरा वाजेपर्यंत १७ पूर्णांक ७३ शतांश टक्के मतदान झालं.

नवी मुंबई महानगरपालिकेत १९ पूर्णांक ६८ शतांश टक्के,

ठाणे १९ टक्के,

वसई विरार १९ पूर्णांक ३४ शतांश टक्के,

पनवेल १७ टक्के,

उल्हासनगर साडे नऊ टक्के,

नागपूर १२ टक्के,

अमरावतीमधे १७ पूर्णांक १ दशांश टक्के मतदान झालं.

अहिल्यानगर महानगरपालिकेत २० पूर्णांक १६ शतांश टक्के,

नांदेड वाघाळा महानगरपालिकेत १७ पूर्णांक १४ शतांश टक्के,

अकोला १७ पूर्णांक २५ शतांश टक्के,

लातूर १८ पूर्णांक २२ शतांश,

परभणी २६ पूर्णांक ४७ शतांश,

जालना २० पूर्णांक १३ शतांश,

सोलापूर १८ टक्के,

सांगलीमधे १७ पूर्णांक २० शतांश तर

पिंपरी चिंचवडमधे १६ टक्के मतदान झालं.

नाशिक १६ टक्के,

धुळे महानगरपालिकेत १४ पूर्णांक २३ शतांश टक्के,

इचलकरंजी १८ पूर्णांक ५७ शतांश,

जळगाव १३ पूर्णांक ३९ शतांश,

कोल्हापूर २३ टक्के,

आणि मालेगाव महानगरपालिकेत २० पूर्णांक ९२ शतांश टक्के मतदान झालं.

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा अंदाज जागतिक बँकेनं वर्तवला आहे. स्थानिक मागणी वाढल्यानं ही वाढ होण्याची शक्यता आहे. तर पुढच्या आर्थिक वर्षात आर्थिक वृद्धी दर कमी होऊन साडेसहा टक्क्यांवर येईल, असा अंदाज या अहवालात व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

इराणमधल्या अस्थिर राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिकांनी इराणला जाऊ नये असा सल्ला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिला आहे. इराणमधे असलेले भारतीय नागरिक आणि भारतीय वंशाच्या इराणी नागरिकांनी निदर्शनं सुरू असलेल्या ठिकाणी जाणं टाळावं असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. इराणमधे निवासी व्हिसावर राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी भारतीय दूतावासात नोंद करण्याचं आवाहनही मंत्रालयानं केलं. तर तेहरानमधल्या भारतीय दूतावासाने भारतीय नागरिकांना तात्काळ इराण सोडण्याचा सल्ला दिला. तसंच काही मदत हवी असल्यास ९ ८ ९ १ २ ८ १ ० ९ १ १५ या क्रमांकावर संपर्क साधण्यास सांगितलं आहे.

ब्रिटननं तेहरानमधला आपला दूतावास काही काळासाठी बंद केला असून तिथल्या कर्मचाऱ्यांना परत बोलावलं आहे. त्याआधी अमेरिकेच्या दूतावासानेही अमेरिकन नागरिकाना इराण सोडण्याचं आवाहन केलं आहे.

<><><><><>

देशभरात आज ७८वा सेना दिवस साजरा होत आहे. सेना दिनानिमित्त शूर जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांना यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. देशाची एकता आणि सार्वभौमत्वाचं रक्षण करण्यासाठी सैन्यदलं वचनबद्ध आहेत, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं. सैनिक देशाच्या सीमांचं रक्षण करतात आणि आपत्तीच्या काळात लोकांच्या मदतीला धावून जातात, देशावरची त्यांची अविचल निष्ठा देशवासियांना सतत प्रेरणा देत राहते, असंही त्या म्हणाल्या.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी शूर सैन्याधिकारी, सैनिकांच्या शौर्याला अभिवादन करत सेना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सैनिकांचं शौर्य, शिस्त आणि त्यागामुळे देशाचं रक्षण होतं, असं ते म्हणाले.

देशाचे सैनिक हे निस्वार्थ सेवा आणि दृढ वचनबद्धतेचं प्रतीक आहेत, असे गौरवोद्गार प्रधानमंत्री **नरेंद्र मोदी** यांनी काढले. हे निस्वार्थ भावनेचं प्रतीक असून त्यांच्यामुळे देशवासियांमधे आत्मविश्वासाची भावना निर्माण होते, असं ते म्हणाले.

**सेनादिनानिमित्त** जयपूरमधे आज सेनादलाचं संचलन होत आहे. जगतपुरा इथं हजारो नागरिकांच्या उपस्थितीत भारतीय सैन्यदलाचे जवान आपली शिस्त, सामर्थ्य आणि लष्करी क्षमतांचं प्रदर्शन करत आहेत.

**//<><><><><>//**